पुढारी

पुणे, गुरुवार, ८ फेब्रुवारी २०२४

५

# हुतात्मा राजगुरूंच्या कर्तृत्वाचा वारसा पुढे चालवावा

## ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचे आवाहन; वार्षिक पारितोषिक व गुणगौरव समारंभ

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान देणाऱ्या हुतात्मा राजगुरूंच्या विचारांचा, कर्तृत्वाचा वारसा विद्यार्थ्यांनी पुढे चालवावा. प्रामाणिकपणे अभ्यास करावा आणि स्वतःला करिअरमध्ये सिद्ध करावे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभ बुधवारी (दि. ७) पार पडला. त्या वेळी ॲड. बुट्टे पाटील बोलत होते. संस्था उपाध्यक्ष [illegible] टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर आदी या वेळी उपस्थित होते.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभ उत्साहात पार पडला.

ॲड. बुट्टे पाटील यांनी दोन्ही महाविद्यालयांतील विविध उपक्रम व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था प्रयत्नशील असून, विद्यार्थ्यांच्या प्रबोधनासाठी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा आदर करावा. आपले सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी स्वतः प्रयत्न करावेत. आपल्या कलागुणांनी स्वतःला समृद्ध करावे. विद्यार्थ्यांनी बेशिस्तपणा न करता अभ्यासाकडे पूर्ण लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

महाविद्यालयातील क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवायोजना, राष्ट्रीय छात्रसेना, सांस्कृतिक विभाग तसेच विविध शाखांतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. क्रीडा विभागातील मीनाक्षी साळुंखे, सृष्टी बोऱ्हाडे, आदिल सिकीलगार, तनिष्का काळे, आविष्कार स्पर्धेतील सुमीत इंगोले, एनसीसीतील निरंजन कोरडे, तेजस देसले, वक्तृत्व स्पर्धेतील तेजस्विनी गौड, अक्षता कोळेकर यांच्यासह पीएच. डी.प्राप्त प्राध्यापकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

अहवालवाचन प्राचार्य. डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले. पारितोषिक वाचन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा. दिलीपकुमार गुप्ता यांनी केले. उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी आभार मानले.

Scanned with OKEN Scanner